**ठळक बातम्या**

- देशाचा विकास गावखेड्यांच्या विकासातून साकार होतो, या महात्मा गांधींच्या संकल्पनेवर पंचायती राज योजना राबवण्यात येत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन/ बिहारसाठीच्या साडेतेरा हजार कोटी विकासकामांचं केलं लोकार्पण आणि भूमीपूजन
- पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारने आज नवी दिल्ली इथं बोलावली सर्वपक्षीय बैठक
- पाकिस्तानविरोधात विविध कठोर उपाययोजना जाहीर/ पाकिस्तानची तिखट प्रतिक्रीया
- पहलगाम हल्ल्यानंतर जम्मू कश्मीर मध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातल्या पर्यटकांची पहिली तुकडी विशेष विमानाने मुंबईत सुखरूप परतली

**आणि**

- छत्तीसगढमधे सुरक्षादलांबरोबरच्या चकमकीत ३ माओवादी ठार

**<><><><><>**

देशाचा विकास गावखेड्यांच्या विकासातून साकार होतो, या महात्मा गांधींच्या संकल्पनेवर पंचायती राज योजना राबवण्यात येत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. बिहारमध्ये मधुबनी इथे पंचायती राज दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. गेल्या दशकात पंचायतींना बळकट करण्यासाठी पावलं उचलण्यात आली आहेत. २ लाखांहून अधिक ग्रामपंचायती इंटरनेटने जोडल्या गेल्या त्यामुळे अनेक आवश्यक कागदपत्रं मिळणं सुलभ झालं.

स्वातंत्र्यानंतर अनेक दशकांनंतर ३० हजार नवीन पंचायत भवन इमारती बनवल्या गेल्या. तसंच दहा वर्षांत २ लाख कोटींहून अधिक निधी पंचायतींना मिळाला आहे असंही मोदी यावेळी म्हणाले.

या वेळी मोदी यांच्या हस्ते १३ हजार ५०० कोटी रुपये खर्चाच्या अनेक विकास प्रकल्पांचं पायाभरणी, उद्घाटन आणि लोकार्पण करण्यात आलं. यात जयनगर ते पाटणा दरम्यान धावणाऱ्या नमो भारत रॅपिड रेल्वे आणि सहरसा ते मुंबईत लोकमान्य टिळक टर्मिनस पर्यंत धावणाऱ्या अमृत भारत एक्सप्रेसचा समावेश आहे. तसंच, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या १५ लाख नव्या लाभार्थ्यांना प्रधानमंत्र्यांच्या हस्ते स्वीकृती पत्र प्रदान करण्यात आली. या योजनेच्या १० लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ताही त्यांच्या हस्ते जारी करण्यात आला आणि १ लाख लाभार्थ्यांचा गृहप्रवेशही करण्यात आला. ५ हजार ३० कोटी रुपये खर्चाच्या विद्युत प्रकल्पांचं लोकार्पण करण्यात आलं. पहलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्यांना प्रधानमंत्र्यांनी काही क्षण मौन पाळून आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारने आज नवी दिल्ली इथं सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. संध्याकाळी सहा वाजता ही बैठक संसद भवनात होणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग बैठकीत माहिती देण्याची शक्यता आहे. या हल्ल्यानंतर पाकिस्तानविरोधात सरकारने योजलेल्या उपायांबद्दल ते सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना माहिती देतील.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये पहलगाम इथं मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील संरक्षण सल्लागारांना आठवडाभरात भारत सोडण्याचे आदेश दिले आहेत. याचबरोबर, भारताने इस्लामाबादमधल्या भारतीय उच्चायुक्तालयातून भारतीय संरक्षण, नौदल आणि हवाई सल्लागार परत बोलवण्याची घोषणा केली आहे. भारत आणि पाकिस्तानदरम्यान असलेला, 1960 चा सिंधू पाणी करार तत्काळ प्रभावाने स्थगित करण्यात आला आहे. वाघा-अटारी सीमा बंद करण्यात आली असून, सार्क व्हिसा सवलत योजना पाकिस्तानी नागरिकांसाठी रद्द करण्यात आली आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी काल नवी दिल्लीत प्रसार माध्यमांशी बोलताना ही माहिती दिली. भारताने पाकिस्तानविरुद्ध उचलेल्या धोरणात्मक पावलांविषयी पाकिस्तानने तिखट प्रतिक्रिया दिली आहे,

सिंधू करारातून बाहेर पडण्यासाठी भारत बऱ्याच काळापासून प्रयत्न करत आहे असं पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा असिफ यांनी म्हटलं आहे. पाकिस्तानला शेजारी देशाशी सलोख्याचे संबध राखायचं असल्याचं सांगत, मात्र भारताने कठोर पावलं उचललीच तर पाकिस्तान उत्तर द्यायला समर्थ असल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. बलुचिस्तान आणि खैबर पख्तुनवामधल्या दहशतवादाला भारत खतपाणी घातल असल्याचा आरोपही त्यानी केला आहे, पाकिस्तानचे उपप्रधानमंत्री आणि परराष्ट्रमंत्री इशाक डार यांनीही भारताची भूमिका चुकीची असल्याचं म्हटलं आहे.

<><><><><>

पहलगाम इथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर हिमाचल प्रदेशमध्ये सिमला इथे स्थानिक जनतेने दहशतवादाविरोधात आज निदर्शनं केली. सिमल्यातल्या व्यापाऱ्यांनीही अर्ध्या दिवसाचा बंद पाळत या घटनेचा निषेध केला आहे. खुंटी जिल्ह्यातही स्थानिक व्यापाऱ्यांनी या घटनेचा निषेध करत एक दिवसाचा बंद पाळला. या हल्ल्याच्या निषेधार्थ खुंटी जिल्ह्यात अनेक ठिकाणी मशाल रॅली काढण्यात आली. या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर हिमाचल प्रदेशच्या काँग्रेस समितीने येत्या २६ एप्रिल रोजी सिमल्यात आयोजित केलेली संविधान बचाओ रॅली स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ भाजप नेते आणि कार्यकर्त्यांनी आज दिल्लीतल्या पाकिस्तानी उच्चायुक्तालयाबाहेर निदर्शनं केली. या घटनेबद्दल देशातल्या जनतेच्या मनात संताप असून सरकारच आणि देशाचं सैन्य पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देईल, अशी प्रतिक्रिया भाजप आमदार सतीश उपाध्याय यांनी यावेळी माध्यम प्रतिनिधींना दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज मुंबईतल्या बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये इंडिया स्टील 2025 या सर्वात मोठ्या आंतरराष्ट्रीय स्टील प्रदर्शनाचं दूरस्थ माध्यमातून उद्घाटन होणार आहे. तीन दिवसांच्या या आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषदेत जागतिक पोलाद मूल्य साखळीतील आघाडीचे देश एकत्र येऊन, भविष्यातील वाटचालीवर चर्चा करणार आहेत. या परिषदेत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह छत्तीसगड आणि ओडिशाचे मुख्यमंत्री सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

**<><><><><>**

जम्मू कश्मीर मध्ये दहशतवाद्यांच्या हल्ल्यानंतर तिथे अडकलेल्या महाराष्ट्रातल्या पर्यटकांची पहिली तुकडी विशेष विमानाने आज  पहाटे साडेतीन वाजता मुंबई विमानतळावर सुखरूप पोहचली. शिवसेनेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचं गुलाबपुष्प देऊन स्वागत केलं.

पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या महाराष्ट्रातील हेमंत जोशी, संजय लेले आणि अतुल मोने या तिघांवर काल रात्री डोंबिवलीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या तिघांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेतलं आणि त्यांच्या कुटुंबियांचं सांत्वन केलं.

पुण्याचे कौस्तुभ गनबोटे आणि संतोष जगदाळे तसंच नवी मुंबईचे दिलीप दिसले या पर्यटकांचाही या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. कौस्तुभ गनबोटे आणि संतोष जगदाळे यांचं पार्थिव शरीर आज पहाटे पुण्यात आणण्यात आलं.  पनवेलमधील दिलीप दिसले यांच्या पार्थिव देहावर काल पनवेल मध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

**<><><><><>**

अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे डी व्हॅन्स आज जयपूर आंतरराष्ट्रीय विमानतळावरून वॉशिंग्टनसाठी रवाना झाले. व्हॅन्स आपल्या कुटुंबासह दिल्लीहून जयपूरला सोमवारी आले होते. जयपूरमधे त्यांनी मंगळवारी अंबर फोर्ट पॅलेसला भेट दिली  आणि भारत - अमेरिका संबंधावर भाषण केलं. त्यानंतर  त्यांनी काल आग्रातल्या ताजमहलला भेट दिली आणि संध्याकाळी जयपूरला परतले होते.

**<><><><><>**

छत्तीसगढ आणि तेलंगणाच्या सीमाभागात सुरक्षादलांबरोबरच्या चकमकीत आज ३ माओवादी अतिरेकी ठार झाले.  बिजापूर जिल्ह्यातल्या कारेगुट्टा टेकड्यांच्या परिसरात माओवादी संघटनांचे म्होरके लपून बसले असल्याची खबर मिळाल्यावरुन संयुक्त शोध अभियान गेले २ दिवस सुरु आहे.छत्तीसगढ, तेलंगण आणि महाराष्ट्राच्या सुरक्षा दलांचं संयुक्त पथक ही मोहीम राबवत आहे.

**<><><><><>**

यूक्रेनची राजधानी कीववर रशियाने केलेल्या क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यात दोन जण ठार तर ५४ जण जखमी झाले. जखमींमध्ये लहान मुलांचा समावेश आहे. रशियाकडून केलेल्या ड्रोन हल्ल्यामुळे कीव शहरात ठिकठिकाणी आगी लागल्या. त्यामुळे निवासी इमारतींचं नुकसान झालं असून त्यांच्या ढिगाऱ्याखाली लोक अडकले असण्याची भीती यूक्रेनच्या प्रसार माध्यमांनी व्यक्त केली आहे. खारकिव शहरात बॉम्बस्फोट झाल्याचंही वृत्त आहे.

**<><><><><>**

जागतिक आरोग्य संघटनेकडून राबवल्या जाणाऱ्या जागतिक लसीकरण सप्ताहाला आजपासून जगभरात सुरुवात झाली. हा सप्ताह ३० एप्रिलपर्यंत पाळला  जाईल. ‘लसीकरण सर्वांसाठी मानवीदृष्ट्या शक्य आहे,’ अशी यंदाच्या सप्ताहाची संकल्पना आहे. लसीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी हा सप्ताह दरवर्षी एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पाळला जातो. लसीकरणामुळे गेल्या ५० वर्षात १५ कोटी ४० लाख लोकांचा जीव वाचल्याचा दावा जागतिक आरोग्य संघटनेनं केला आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेश, बिहार ओदिशा, झारखंड, छत्तीसगढ,विदर्भ आणि पश्चिम बंगालचा काही भाग इथे येत्या शनिवारपर्यंत उष्णतेच्या लाटेचा प्रभाव असेल असा अंदाज भारतीय हवामान खात्यानं वर्तवला आहे. ईशान्य भारतासह, पूर्व राजस्थान, पंजाब, हरियाणा आणि दिल्ली इथे हवेतला उष्मा कायम राहण्याचा तर पूर्वेकडे तापमानात 2 ते तीन अंश सेल्सिअसने वाढ होण्याचा अंदाज वर्तवला आहे. दक्षिण भारतात या काळात  कर्नाटक, आंध्र किनारपट्टी, रायलसीमा, केरळ, तामिळनाडू या भागात विजांच्या कडकडाटासह पाऊस पडेल असा हवामानखात्याचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**